# बोर्ड प्रश्नपत्रिका : मार्च २०१५

**वेळ : ३ तास** **एकूण गुण : ८०**

**प्र.१. अ) योग्य पर्याय शोधून पुढील विधाने पूर्ण करा.** **[०४]**

१. हो तुमच्या जवळसुद्धा. तुमच्या जवळ म्हणजे ________ .
(अ) तुमच्या घरी (ब) तुमच्या शाळेत
(क) तुमच्या दप्तरात (ड) तुमच्या शेजारी

२. निसर्गच तर माणसाला ________ .
(अ) चिंतनशील करतो (ब) विचारशील करतो
(क) कृतिशील करतो (ड) सृजनशील करतो

३. पन्हाळ्याचा उरुस आम्हा सर्वांच्यासाठी ________ .
(अ) खूप कष्टाचा होता (ब) खूप महाग होता
(क) खूप आनंदाचा होता (ड) खूप रोमांचकारी होता

४. हिमालयाचं मला झालेलं पहिलं दर्शन केवळ ________ .
(अ) अविस्मरणीय (ब) अद्‌भुत
(क) आश्चर्यजनक (ड) अवर्णनीय

**आ) खालील वाक्यांतील रिकाम्या जागी कंसातील शब्दांपैकी योग्य शब्द वापरून वाक्ये पुन्हा लिहा.** **[०३]**

१. ________ माणसाजवळ आपण जेवढे मोकळे होतो तेवढे जवळच्या माणसापाशी होऊ शकत नाही.
(दूरच्या / घरातल्या / परक्या / नात्याच्या)

२. सर्वांमुळे एक ________ स्वायत्त गरिबी उपभोगली.
(आगळीवेगळी / मुलखावेगळी / जगावेगळी / निराळी)

३. रविवर्म्यानं आपला ________ पानाचा डबा गोद वर्म्याच्या हाती दिला.
(पितळेचा / चांदीचा / तांब्याचा / स्टीलचा)

**इ) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.** **[०३]**

१. नारायण सुर्वे कोणत्या मासिकाचे संपादक झाले?
२. परिवर्तनात कशाचे अडसर ओलांडायला हवेत?
३. केशवच्या घरातील किचन ओट्याला किती खर्च आला?

**प्र.२ अ) खालीलपैकी कोणत्याही एका वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.** **[०३]**

१. ‘बघा बाबूजी, तुमची जागा हॉलमध्ये नाही तर जिन्यात आहे.’
२. ‘त्या निसर्गाची भाषा केवढी वेगळी!’

**आ) खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ५० ते ६० शब्दांत लिहा.** **[०९]**

१. स्वामी विवेकानंद यांनी आपल्या हातचे भोजन स्वीकारावे यासाठी चेतूने आग्रह कसा केला?

२. परिवर्तनात कोणत्या भिंती ओलांडणे लेखिका-विद्या बाळ यांना अपेक्षित आहे?

३. 'ईद' या साणाच्या दिवशी लेखिका आशा आपराद यांच्या घरी वातावरण कसे असे?

४. बाबूजींनी आपल्या मुलांच्या भवितव्यासाठी कोण-कोणते कष्ट घेतले?

५. पुस्तकरावाला कशाकशाचा त्रास होतो?

**प्र.३ अ) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.** **[०३]**

१. संत नरहरी सोनार यांनी दीनानाथ कोणास म्हटले आहे?

२. कवीच्या घरट्यामध्ये मंद्र सप्तकात कोण गाते?

३. 'गाव' या कवितेतील आमराई कोठे आहे?

**आ) खालील पद्यपंक्तींतील रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द भरून पंक्ती पुन्हा लिहा.** **[०३]**

१. असा प्रलय व्हावा ________ तुफान सुटावं.

(समतेचं / विविधतेचं / एकतेचं / आपलेपणाचं)

२. नाही माझ्या घरट्यात ________ फुलांचा संभार.

(भाव / कल्प / स्वप्न / काव्य)

३. ________ पीक नाचते काळ्याभोर शिवारी.

(पिवळेजर्द / हिरवेगार / निळेशार / काळेभोर)

**प्र.४. अ) खालीलपैकी कोणत्याही एका पद्यपंक्तीचा संदर्भ देऊन सरळ अर्थ लिहा.** **[०३]**

१. ' अपराध करी क्षमा। तुझा न कळे महिमा।।'

२. 'मातीलाही सुगंध यावा कष्टाच्या भाकरीचा. '

**आ) खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ५० ते ६० शब्दांत लिहा.** **[०९]**

१. संत सोयराबाई यांनी संसाराची तुलना मृगजळाबरोबर कशी केली आहे?

२. 'प्रलय' या कवितेत कवीने माणसाकडून कोणती अपेक्षा केली आहे?

३. कवी ऋषीकेश कांबळे यांच्या मते स्त्रीने आपले हक्क मिळविण्यासाठी काय करावे?

४. एकत्वाचे कोणते विचार 'एकत्वाचे गीत महान' या कवितेतून प्रकट झाले आहेत?

५. जीवनातील श्रमाचे महत्त्व कवी ग.दि. माडगूळकर यांनी कसे सांगितले आहे?

**प्र.५ खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ६० ते ७० शब्दांत लिहा. (कोणतेही दोन)** **[०८]**

१. नागनाथअण्णा नायकवडी यांनी विद्यार्थिदशेत स्वातंत्र्यचळवळीत कसा भाग घेतला?

२. 'गावाची संस्कृती स्थानिक परंपरांतून निर्माण झालेली असते.' हे विधान पाठाच्या आधारे सोदाहरण स्पष्ट करा.

३. जुईचे आईबाबा घरी कोणकोणती कामे करतात?

४. पाण्याचे महत्त्व, अम्मा पत्रातून कसे वर्णन करते?

**किंवा**

**खालीलपैकी कोणत्याही एका पाठाचा सारांश १०० ते १२० शब्दांत तुमच्या भाषेत लिहा.**

१. प्रतिसरकार

२. मुलांचे स्वप्न

**प्र.६. अ) खालील वाक्यांपैकी कोणतेही एक वाक्य लेखननियमांनुसार लिहा.** [०२]

१. मित्रांशी गपा मारताना आपण खुप मोकळे असतो.

२. महाराष्टाबाहेर मास्तरांची फीरती सुरू झाली.

**आ) खालील सामासिक शब्दांपैकी कोणत्याही दोन सामासिक शब्दांचा समास ओळखा.** [०२]

| | |
|---|---|
| १. भाजीभाकरी | २. पतीपत्नी |
| ३. पंचप्राण | ४. हारजीत |

**इ) कंसातील सूचनेनुसार बदल करून कोणतीही दोन वाक्ये लिहा.** [०२]

| | |
|---|---|
| १. तुम्ही खूप लाजताय. | (उद्‌गारवाचक करा) |
| २. सारे अडथळे ओलांडायला हवेत | (प्रश्नार्थी करा) |
| ३. अशी का चालते सृष्टी | (विधानार्थी करा) |

**ई) खाली कंसात दिलेल्या वाक्प्रचारांचा त्याखाली दिलेल्या वाक्यांत योग्य त्या ठिकाणी उपयोग करून वाक्ये पुन्हा लिहा. (कोणतेही चार)** [०४]

(मन न रमणे,अश्रू गाळणे, हर्षभरित होणे, हैराण करणे, आयुष्याचे सार्थक होणे, हिरावून घेणे)

१. वर्गात पहिला नंबर आला हे कळताच प्राजक्तास खूप आनंद झाला.

२. शिक्षणानंतर चांगली नोकरी मिळाली की, आपण जीवनात यशस्वी झालो असे अनेकांना वाटते.

३. मुले विनाकारण मुक्या प्राण्यांना त्रास देतात.

४. वकिली व्यवसाय त्यांना आवडत नसे.

५. इतरांचा आनंद कधी हिसकावून घेऊ नये.

६. दुष्काळाचे चटके सहन करताना शेतकऱ्यांना दु:ख झाले.

**प्र.७. अ) खालील उतारा वाचून त्यावर चार प्रश्न तयार करा.** [०४]

[प्रत्येक प्रश्नाचे उत्तर **एका** वाक्यात येईल असे प्रश्न तयार करावेत]

'प्रेम करा, प्रेम करा', म्हणून जगात एकसारखा उपदेश चाललेला दिसतो. प्रेम केल्याने आपला आनंद वाढतो. आपण सुखी होती, हेही खोटे नाही. पण प्रेम करायचे म्हणजे वाटते तितके सोपे नाही. जो आवडत नाही त्याच्यावर प्रेम करता येत नाही. आपली आवड-नावड बहुतेक वेळा आपल्या स्वार्थावर अवलंबून असते. आपले ऐकेल तो आपला आवडता, आपले ऐकत नाही तो नावडता, असा साधारणपणे माणसाचा स्वभाव असतो. म्हणून 'प्रेम करा' म्हटल्याने प्रेम करणे साधणार नाही. आपण स्वार्थाच्या दृष्टीने दुसऱ्याकडे पाहण्याची ही सवय कमी केली पाहिजे. आपल्या स्वार्थाऐवजी समोरच्या माणसाच्या गुणांवर दृष्टी ठेवण्याचे आपण आपल्या मनाला वळण लावले पाहिजे. आपल्या संगतीत आलेल्या प्रत्येकाचे गुण पाहावयास शिकावे, जो गुण दिसतो त्याचे कौतुक करावे म्हणजे प्रेम वाढत जाते.

दुसऱ्याबद्दल आदरभाव वाढल्या खेरीज प्रेम निर्माण होणे कठीण आहे. हे आपण ध्यानात ठेवावे.

**आ) खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे गोष्ट लिहा. योग्य शीर्षक देऊन तात्पर्य लिहा.** [०४]

[**मुद्दे** : एक बालकप्रेमी राजा - त्याचा एक कर्मचारी – राजाने म्हटले, आपल्या नगरीमधून सर्वांगसुंदर बालक शोधून घेऊन ये – कर्मचाऱ्याचे संपूर्ण नगरात भटकणे - शोध घेणे – प्रत्येक बालकात कोणती ना कोणती उणीव भासणे – थकून घरी परतणे – अंगणात स्वत:च्या बालकाला खेळत असताना पाहणे – काळासावळा – त्याला तोच सर्वांगसुंदर वाटणे – त्यालाच राजाकडे घेऊन जाणे – परिणाम – तात्पर्य]

**इ) पुढील विषयावर पत्र लिहा.** [०४]

सुनिता/संजय नारळीकर 'श्रीनिवास' घाटकोपर, पश्चिम मुंबई नं. ७८ येथून दूषित पाण्याबाबत माननीय पाणीपुरवठा अधिकारी, मुंबई महानगरपालिका, मुंबई यांना पत्र लिहिते/लिहितो.

**किंवा**

**खालील विषयावर वृत्तान्त लिहा.**

शाळेत झालेल्या 'रक्तदान शिबिराचा' वृत्तान्त लिहा.

**किंवा**

**खालील विषयावर जाहिरातलेखन करा.**

आईस्क्रीमच्या नवीन दुकानाची जाहितात करा.

**प्र.८. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे १५० शब्दांपर्यंत निबंध लिहा.** [१०]

१. **वृक्ष नष्ट झाले तर !**

[**मुद्दे** - वृक्षांचा सहवास माणसाला सुखद – वृक्ष माणसांसाठी जगतात – पाखरांचे आश्रयस्थान – माकडांचे विहारस्थान – वृक्षांकडून मिळणारा संदेश – मातीवरील निष्ठा – वृक्ष नसतील तर जीवन रुक्ष – पाऊस नसेल – दुष्काळ – प्रदूषण – वृक्ष हवेतच.]

२. **शेतकऱ्याचे आत्मवृत्त.**

[**मुद्दे** - नाव – गाव – शिक्षण - शेतीच्या कामाची लहानपणापासून सवय – दिवसभर शेतात राबणे – निसर्गाने साथ दिली तर पिके चांगली – नवे शोध, अधिक उत्पादनाची तंत्रे, औषधे, बी, अवजारे – नवी पिढी सुशिक्षित - शेती करायला तयार नाही – काही अपेक्षा.]

३. **माझा आवडता समाजसुधारक:**

[**मुद्दे** - जन्म – बालपण – थोडक्यात परिचय – जनजागरण – सामजसुधारणा – संताप्रमाणे विरक्त, निस्वार्थी, नवसमाजाची निर्मिती – टीका सहन करून ध्येयपूर्ती – संपूर्ण कुटुंबाचा कार्यात सहभाग – का आवडतो?]